**Covid-19**
**Urgent**

जिल्हाधिकारीकार्यालय, वर्धा
(जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण)
महात्मा गांधी पुतळया जवळ, सिव्हील लाईन, वर्धा

दूरध्वनी क्रमांक (07152) 243446 /240872
फॅक्स क्रमांक (07152) 240533

वेबसाईट - www.wardha.nic.in
ई-मेल-wardhardc@gmail.com

क्र. जिआव्यअ/कोरोना विषाणू /कावि- ३१०५/२०२० दिनांक - ०६ जुलै, २०२०.

**वाचा** - (१) साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ च्या अधिसूचना दिनांक १४ मार्च, २०२०.
(२) आपत्ती व यवस्थापन कायदा – २००५.

**अधिग्रहण आदेश.**

ज्याअर्थी, कोरोना विषाणू (COVID-19) चा संसर्ग पसरण्याची शक्यता लक्षात घेता, त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणूचे संसर्ग असल्यास त्यात अधिक वाढ होवू न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे. अश्या व्यक्तींमुळे आपत्तीजनक परिस्थिती वर्धा जिल्ह्यात उद्भवू नये यासाठी पुर्वतयारी करणे अगत्याचे झाले आहे.

त्याअनुषंगाने, कोरोना विषाणू (COVID-19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि. १३ मार्च, २०२० पासून लागु करुन खंड २, ३, व ४ मधील तरतुदी नुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढु नये म्हणून आवश्यक उपाययोजना करण्याचे दृष्टिने, **महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्व विद्यालय, वर्धा येथील होस्टेल (वस्तीगृह)** अधिग्रहीत करुन देण्याबाबत तहसिलदार, वर्धा यांनी विनंती केलेली आहे.

त्याअर्थी, मी विवेक भीमनवार, जिल्हाधिकारी, वर्धा आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ चे कलम ३० (२४), ३४(क) तसेच कलम ६५(ख) (ग) अन्वये, **Quarantine Facility तयार करण्याकरीता** महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्व विद्यालय, वर्धा येथील होस्टेल (वस्तीगृह) **उपलब्ध आवश्यक सुविधेसह या आदेशाव्दारे, पुढील आदेशापर्यंत अधिग्रहीत करण्यात येत आहे.**

सदर्हु अधिग्रहण आदेशान्वये, **कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा यांनी** महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्व विद्यालय, वर्धा येथील होस्टेल (वस्तीगृह) ताब्यात घेऊन Quarantine Facility करीता आवश्यक त्या सुविधा, जिल्हा आरोग्य अधिकारी, व जिल्हा शल्य चिकित्सक, वर्धा यांचे सुचनेप्रमाणे, उपलब्ध करण्याबाबत कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाही बाबत या कार्यालयास अवगत करण्यात यावे.

**स्वा/-**
**(विवेक भीमनवार, I.A.S)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हाआपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा.**

प्रत –

१. मा. विभागीय आयुक्त, नागपुर विभाग, नागपुर यांना माहितीस सविनय सादर.
२. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहिस अग्रेषित.
३. उपविभागीय अधिकारी, वर्धा / जिल्हा शल्यचिकीत्सक, वर्धा / जिल्हा आरोग्य अधिकारी, वर्धा / तहसिलदार, वर्धा यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहिस अग्रेषित.
४. कुलगुरु, महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्व विद्यालय, वर्धा यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहिस अग्रेषित.

जिल्हाधिकारी वर्धा
जिल्हाधिकारी, वर्धा.

D/किशोर-२०२०/करोना विषाणू-२०२०